नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १६२ Issue - 162 | वार - शनिवार दि. ७ नोव्हेंबर २०२६ Blow- Saturday Date 7 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

कर्मभूमी एक्सप्रेसला भीषण आग, जीव वाचवण्यासाठी प्रवाशांची धावपळ



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पटियाला : पंजाबमधील पटियाला आणि राजपुरा दरम्यान आज (६ नोव्हेंबर २०२६) एक मोठी रेल्वे दुर्घटना घडली आहे. सराई बंजारा येथे कर्मभूमी एक्सप्रेस रेल्वेच्या चार डब्यांना आग लागल्याची घटना घडली आहे. धावत्या ट्रेनला लागलेल्या आगीमुळे प्रवाशांमध्ये घबराट पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनेक प्रवासी आगीत अडकले होते. आगीचे कारण आणि झालेल्या नुकसानीबद्दलची माहिती अद्याप मिळालेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, ही ट्रेन पंजाबहून बिहारकडे जात होती यावेळी पटियाला येथे या रेल्वेला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. धुराचे लोट वेगाने पसरले आणि प्रवासी घाबरून खाली उतरू लागले. आगीचे अनेक भयानक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आले आहेत. दिवाळीसाठी रेल्वेगाड्या खचाखच भरलेल्या असतानाच हा अपघात घडला. कर्मभूमी एक्सप्रेसला आग लागल्याने प्रवासी चिंतेत आहेत. मात्र, कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. सर्व प्रवासी वेळेवर उतरल्याने मोठा अनर्थ टळल्याची माहिती मिळत आहे.

प्राथमिक माहितीनुसार, ट्रेनच्या इंजिनमधून पाचव्या डब्यापर्यंत धूर निघत असल्याचे दिसून आले. यानंतर रेल्वे प्रशासनाला या घटनेची माहिती देण्यात आली आणि अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांना सतर्क करण्यात आले. सराई बंजारा परिसराजवळ ट्रेनच्या चार डब्यांना आग लागल्याचे वृत्त आहे. या घटनेमुळे ट्रेनमधील प्रवाशांमध्ये घबराट पसरली. अनेक प्रवाशांनी आपल्या सामानासह डब्यांमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. काही प्रवासी आगीत सापडल्याचेही वृत्त आहे. मात्र, जखमींची संख्या आणि संभाव्य जीवितहानीबाबतची अधिकृत माहिती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. आग लागल्यामुळे नेमकं किती नुकसान झालं, याची माहिती समोर आलेली नाही. सणासुदीचे दिवस असल्यानं ट्रेनमध्ये बरीच मोठी गर्दी होती. त्यामुळे मोठा अनर्थ घडण्याची शक्यता आहे. दरम्यान, शॉर्ट सर्किटमुळं आग लागल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रायपुरा जंक्शनच्या आधी सराय बंजारा जवळ कर्मभूमी एक्स्प्रेस आग लागली. आग सर्वप्रथम पँट्री कारमध्ये लागल्याची माहिती समोर आली आहे. यानंतर आग झपाट्यानं पसरत गेली. बघता बघता चार डब्यांनी पेट घेतला. या आगीत सुदैवानं कोणतीही जीवितहानी झालेली नाही. सध्या मदत आणि बचाव पथक कार्य सुरू आहे.

दुष्काळग्रस्त ८७ लाख ४५ हजार शेतकऱ्यांना ४,३७२ कोटींची दिवाळी अग्रीम मदत

विभागनिहाय आणि जिल्हानिहाय मदतीचे वितरण; तांत्रिक अडचणी दूर करून उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही मदत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यातील ३०४ दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी आर्थिक दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येकी पाच हजार रुपये दिवाळी अग्रीम देण्याची ग्वाही दिली होती. यानुसार ५ नोव्हेंबर २०२६ अखेर राज्यातील ८७ लाख ४५ हजार ६६९ शेतकऱ्यांच्या खात्यात ४ हजार ३७२ कोटी ८३ लाख रुपयांची दिवाळी अग्रीम मदत वितरित झाली आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही मदत देण्याची प्रक्रिया सुरू असून, तांत्रिक अडचणींमुळे काही शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा झाली नसल्यास त्या अडचणी दूर करून त्यांनाही अग्रीम मदत देण्यात येणार असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील

राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सणासुदीच्या काळात आर्थिक आधार मिळावा, यासाठी शासनाने दिवाळी अग्रीम मदतीचा निर्णय घेतला. महसूल, मदत व पुनर्वसन आणि कृषी विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मदत वितरणाची प्रक्रिया युद्धपातळीवर राबवून थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदतीची रक्कम जमा करण्यावर भर देण्यात आला. या मदतीमुळे लाखो शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला आहे, असेही मंत्री जाधव पाटील यांनी सांगितले.

विभागनिहाय आणि जिल्हानिहाय मदत वितरण

अमरावती विभागातील १२ लाख ८२ हजार २०३ शेतकऱ्यांच्या खात्यात ६४१ कोटी १० लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये अकोला जिल्ह्यातील १ लाख ६२ हजार १५२ शेतकऱ्यांना ८१ कोटी ८ लाख रुपये, अमरावती जिल्ह्यातील ३ लाख ६ हजार ७०९ शेतकऱ्यांना १५३ कोटी ३५ लाख रुपये, बुलढाणा जिल्ह्यातील ४ लाख २५ हजार ८३३ शेतकऱ्यांना २१२ कोटी ९२ लाख रुपये, वाशिम जिल्ह्यातील १ लाख ५९ हजार ५०८ शेतकऱ्यांना ७९ कोटी ७५ लाख रुपये आणि यवतमाळ जिल्ह्यातील २ लाख २८ हजार १ शेतकऱ्यांना ११४ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.



छत्रपती संभाजीनगर विभागातील ३३ लाख ३६ हजार ३६० शेतकऱ्यांच्या खात्यात १६६८ कोटी १८ लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये बीड जिल्ह्यातील ६ लाख १२ हजार ९३ शेतकऱ्यांना ३०६ कोटी ५ लाख रुपये, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ४ लाख ४४ हजार ३८२ शेतकऱ्यांना २२२ कोटी १९ लाख रुपये, धाराशिव जिल्ह्यातील ३ लाख ४७ हजार ७२ शेतकऱ्यांना १७३ कोटी ५४ लाख रुपये, हिंगोली जिल्ह्यातील २ लाख १२ हजार ७६० शेतकऱ्यांना १०६ कोटी ३८ लाख रुपये, जालना जिल्ह्यातील ४ लाख ३८ हजार ८४४ शेतकऱ्यांना २१९ कोटी ४२ लाख रुपये, लातूर जिल्ह्यातील ३ लाख ८१ हजार ९६१ शेतकऱ्यांना १९० कोटी ९८ लाख रुपये, नांदेड जिल्ह्यातील ५ लाख ६२ हजार ८६८ शेतकऱ्यांना २८१ कोटी ४३ लाख रुपये आणि परभणी जिल्ह्यातील ३ लाख ३६ हजार ३८० शेतकऱ्यांना १६८ कोटी १९ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.

कोकण विभागातील ६३ हजार ६४७ शेतकऱ्यांच्या खात्यात ३१ कोटी ८२ लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये पालघर जिल्ह्यातील ८ हजार २१३ शेतकऱ्यांना ४ कोटी ११ लाख रुपये, रायगड जिल्ह्यातील २ हजार २१८ शेतकऱ्यांना १ कोटी ११ लाख रुपये, रत्नागिरी जिल्ह्यातील २२ हजार ४९४ शेतकऱ्यांना ११ कोटी २५ लाख रुपये आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ३० हजार ७२२ शेतकऱ्यांना १५ कोटी ३६ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.

नागपूर विभागातील ७ लाख ५० हजार ४१ शेतकऱ्यांच्या खात्यात ३७५ कोटी २ लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये भंडारा (पान २ वर...)



मोहोळ नजीक कार आणि कंटेनरचा भीषण अपघात! चिमुकल्यासह तिघांचा जागीच मृत्यु



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील शेटफळ ते तेलंगवाडी गावादरम्यान कार आणि कंटेनरचा भीषण अपघात झाला आहे. अपघातात आठ वर्षाच्या चिमुकल्यासह तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर अन्य दोन जण अपघातात गंभीर जखमी झाले आहेत. प्राथमिक माहितीनुसार भारंबे कुटुंबीय अक्कलकोटला देवदर्शनासाठी आज सकाळी कल्याणहून निघाले होते, यावेळी अपघात हा भीषण अपघात झाला आहे.

दरम्यान, या अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला आहे. पार्थ तुषार भारंबे (वय ८), विलास चांगु भारंबे (वय ६६) आणि शोभा विलास भारंबे (वय ६३) यांचा मृत्यू झाला. तर तुषार विलास भारंबे आणि पूनम तुषार भारंबे हे पती-पत्नी जखमी झाले आहेत. दुपारी ३ च्या सुमारास मोहोळ तालुक्यात कंटेनरला धडक दिल्याने ही दुर्दैवी घटना घडली आहे. दरम्यान जखमी रुग्णांना पुढील उपचारासाठी शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे. दरम्यान, या अपघातानंतर हळहळ व्यक्त केली जात आहे.

दहावी- बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता १०वी आणि १२वीच्या आगामी वार्षिक परीक्षांसाठीचे अधिकृत वेळापत्रक जाहीर केले आहे. मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, १०वी आणि १२वी अशा दोन्ही वर्गांच्या मुख्य प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा १६ फेब्रुवारी २०२७ पासून एकाच वेळी सुरू होणार आहेत. परीक्षांचे नियोजन अचूक व्हावे आणि विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळावा, या उद्देशाने मंडळाने परीक्षा सुरू होण्याच्या तब्बल १०१ दिवस आधीच हे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे.

सीबीएसईने दिलेल्या माहितीनुसार, प्रात्यक्षिक परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन ०१ जानेवारी २०२७ पासून शाळांच्या स्तरावर सुरू होणार आहे.

त्यानंतर मुख्य लेखी परीक्षांचे वेळापत्रक खालीलप्रमाणे असेल:

इयत्ता १०वी परीक्षा : १६ फेब्रुवारी ते ९ मार्च २०२७

इयत्ता १२वी परीक्षा : १६ फेब्रुवारी ते ९ एप्रिल २०२७

परीक्षेची वेळ : सर्व विषयांचे पेपर्स एकाच सत्रात सकाळी १०:३० ते दुपारी ०१:३० या वेळेत पार पडतील.

परीक्षेच्या पहिल्याच दिवशी म्हणजेच १६ फेब्रुवारी २०२७ रोजी इयत्ता १२वीचा भौतिकशास्त्र विषयाचा महत्त्वाचा पेपर होणार आहे. तर १०वीचा पेंटिंग आणि इतर प्रादेशिक भाषांचा पेपर पार पडेल.

त्यानंतर गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र, इंग्रजी, हिंदी, रसायनशास्त्र तसेच वाणिज्य व कला शाखेचे सर्व प्रमुख पेपर्स टप्प्याटप्प्याने पार पडतील. दोन पेपर्सच्या दरम्यान विद्यार्थ्यांना उजळणीसाठी पुरेसा वेळ देण्यात आला आहे.

देश-विदेशातून ४६ लाखांहून अधिक विद्यार्थी बसणार

या वर्षी सीबीएसई बोर्डाच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. देशभरातून आणि परदेशातील सीबीएसई संलग्न शाळांमधून मिळून एकूण ४६.३ लाखांहून अधिक विद्यार्थी या परीक्षेला बसणार आहेत. यामध्ये इयत्ता १०वीचे सुमारे २६.५ लाख, तर इयत्ता १२वीचे १९.८ लाख विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

संपादकीय....

सुटकेचा निःश्वास

पंजाबमधील राजपुरा परिसरात कर्मभूमी एक्स्प्रेसला आग लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सराय बंजारा आणि बसंतपुरा रेल्वे स्थानकादरम्यान धावत्या ट्रेनच्या चार डब्यांना आग लागल्याने प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली. डब्यांमधून मोठ्या प्रमाणात धूर बाहेर पडू लागल्याने प्रवाशांनी जीव वाचवण्यासाठी तातडीने ट्रेनमधून खाली उतरण्यास सुरुवात केली. सुदैवाने, लोको पायलटच्या प्रसंगावधानामुळे ट्रेन वेळेत थांबवण्यात आली आणि मोठा अनर्थ टळला. अमृतसरहून न्यू जलपाईगुडीकडे जाणाऱ्या १२५०८ क्रमांकाच्या कर्मभूमी एक्स्प्रेसमध्ये दुपारी सुमारे १ वाजून १० मिनिटांनी आग लागली. राजपुरापासून अंदाजे १५ किलोमीटर अंतरावर बसंतपुरा रेल्वे स्थानकाजवळ ही घटना घडली. ट्रेनच्या इंजिनाकडून पाचव्या डब्यात आग लागल्याची माहिती समोर आली. त्यानंतर आग इतर डब्यांपर्यंत पसरल्याने एकूण चार डबे आगीच्या तडाख्यात सापडल्याचे सांगण्यात येत आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन ट्रेन तातडीने थांबवण्यात आली. ट्रेनला आग लागल्याचे लक्षात येताच लोको पायलटने प्रसंगावधान राखत गाडी थांबवली. त्यानंतर रेल्वे कर्मचारी आणि संबंधित यंत्रणांनी प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याची कार्यवाही केली. डब्यांम धून धुराचे लोट बाहेर पडत असल्याचे पाहून प्रवाशांमध्ये घबराट निर्माण झाली होती. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेनंतर परिसरात धुराचे मोठे लोट पसरले होते. दूरवरूनही धुराचे ढग दिसत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेत काही प्रवासी जखमी झाल्याची सुरुवातीला माहिती समोर आली होती. मात्र, उपलब्ध नंतरच्या माहितीनुसार कोणतीही जीवितहानी किंवा जखमी झाल्याची अधिकृत पुष्टी झालेली नाही. आगीमुळे रेल्वेचे किती नुकसान झाले, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. दरम्यान, रेल्वे प्रशासनाकडून घटनेची चौकशी केली जात असून आगीचे नेमके कारण आणि नुकसानीचा तपशील समोर येण्याची प्रतीक्षा आहे. लोको पायलटने वेळीच घेतलेल्या निर्णयामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळल्याने प्रवाशांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

काकांच्या काळात सिनार मासला पाणी, आता पुतण्याचा डेटा सेंटरचा विरोध! ..श्री रोहित पवारजी हा दुटप्पीपणा कशासाठी?

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

महाराष्ट्राच्या राजकारणात दुष्काळ,धरणं आणि शेतकरी हे विषय नेहमीच राजकीय सोयीनुसार चघळले गेले आहेत, याचा नवा अंक आता उजनीच्या पाण्यावरून सुरू झाला आहे.प्रस्तावित असलेल्या 'डेटा सेंटर' प्रकल्पांना आमदार रोहित पवार यांनी विरोध दर्शवला असून, हे प्रकल्प उजनीचं पाणी फस्त करतील आणि शेतकऱ्यांना तहानलेलं ठेवतील असा पवित्रा त्यांनी घेतला आहे. वरकरणी हा शेतकऱ्यांच्या हक्काचा एल्गार वाटत असला तरी इतिहासाची पानं चाळली की या भूमिकेतला दुटप्पीपणा लगेच उघडा पडतो. कारण आज नव्या डेटा सेंटरच्या पाण्याचा हिशोब मांडणाऱ्यांना भिगवणच्या वेशीवर २५ वर्षांपासून उभी असलेली आणि रोज कोट्यवधी लिटर पाणी पिणारी 'सिनार मास' का दिसत नाही, हा प्रश्न थेट उभा राहतो.

नव्वदच्या दशकात देशात उदारीकरणाचे वारे वाहत असताना तत्कालीन सत्ताकेंद्रात असणाऱ्या शरद पवारांच्या थेट पुढाकाराने आणि आशीर्वादाने इंडोनेशियाच्या 'सिनार मास' समूहाला इंदापूरजवळ आणण्यात आलं होतं. परकीय गुंतवणूक आणि रोजगाराचा मोठा गाजावाजा करत या पल्प आणि पेपर मिलला उजनी धरणातून थेट बिगरसिंचन कोट्यातून दररोज तब्बल २८ दशलक्ष लिटर, म्हणजेच २ कोटी ८० लाख लिटर पाण्याचा कोटा मंजूर करून दिला गेला. एका मोठ्या शहराची तहान भागेल एवढं पाणी एका खाजगी कारखान्याच्या घशात घालताना उजनीवर अवलंबून असणाऱ्या दुष्काळी शेतकऱ्याचा विचार त्या वेळी कुठे गहाण ठेवला गेला होता?

गेल्या पंचवीस वर्षांत उजनीच्या पट्ट्याने अनेक भीषण दुष्काळ पाहिले. उजनीची पातळी जेव्हा जेव्हा उणे पातळीत गेली, तेव्हा कालव्यांचे आवर्तन बंद झाले, शेतकऱ्यांच्या पंपांवर छापे पडले आणि उभी पिकं जळून खाक झाली; परंतु भिगवणच्या त्या पेपर मिलची पाईपलाईन मात्र २४ तास पूर्ण क्षम तेने पाणी उपसत राहिली. शेतकऱ्यांच्या घामावर उभ्या राहिलेल्या धरणाचा हक्क एका उद्योगाच्या नफ्यासाठी वर्षानुवर्षे गहाण ठेवला गेला, हे कोणीही नाकारू शकत नाही.

आता तोच इतिहास विसरून आम दार रोहित पवार डेटा सेंटरमुळे शेतीचं पाणी संपेल म्हणून मैदानात उतरले आहेत. डेटा सेंटरला शीतकरणासाठी पाणी लागेल हा तांत्रिक मुद्दा खरा मानला तरी नैतिकतेच्या कसोटीवर हा विरोध पूर्णपणे एकांगी ठरतो.प्रकल्पामुळे दरवर्षी



१.५ TMC पाण्याचे बाष्पीभवन रोखले जाणार असून प्रत्यक्ष वापर कमाल ०.५ ढचउ इतकाच मर्यादित आहे. त्यामुळे वापरायच्या पाण्यापेक्षा बाष्पीभवनातून वाचणारे पाणी तिप्पट असल्याने उलट दरवर्षी धरणात सुमारे १.० TMC पाणी अतिरिक्त शिल्लक राहील. परिणामी, शेतीच्या सध्याच्या सिंचन कोट्यातून पाण्याचा एक थेंबही कमी होणार नाही; उलट हवेत उडून जाणाऱ्या पाण्याची बचत झाल्यामुळे हा प्रकल्प धरणातील पाणी कमी करणारा नसून जलसाठ्यात १ TMC ची निव्वळ भर घालणारा ठरेल. तेव्हा आपल्याच काकांनी परदेशी उद्योगपतीसाठी उजनीचं पाणी मोकळं केलं, तो जर विकास होता; तर मग आज दुसऱ्या प्रकल्पाला विरोध करताना शेतकऱ्यांचा पुळका कसा काय जागा होतो? जर उजनीचं पाणी वाचवण्याची तळमळ इतकीच प्रामाणिक असेल, तर मग आजवर सिनार मास म्हणजेच आताच्या बिल्टच्या त्या अवाढव्य उपशावर एक चकार शब्द का काढला गेला नाही? जुन्या कारखान्यांच्या वॉटर ऑडिटची मागणी करण्याचे धाडस का दाखवले जात नाही?

निवडणुका आल्या की पाण्याचा प्रश्न भावनिक करायचा, सत्ता असताना मर्जीतील उद्योगांना धरणांचे कोटे बहाल करायचे आणि सत्तेबाहेर असताना दुसऱ्याच्या प्रकल्पांवर 'शेतकरी संकटात' अशी ओरड करायची, हा निव्वळ राजकीय संधीसाधूपणा आहे. उजनीच्या पाण्यावर जगणाऱ्या सोलापूर, पुणे आणि अहिल्यानगरच्या सामान्य शेतकऱ्याला हा काका-पुतण्यातील विरोधाभास आता चांगलाच उमजू लागला आहे. आज खरी गरज नव्या किंवा जुन्या राजकारणाची नसून, उजनीतून उपसा होणाऱ्या प्रत्येक थेंबाचा निष्पक्ष हिशोब मांडण्याची आहे. जर शेतकऱ्याचं हित खरोखरच सर्वोपरी असेल, तर आधी त्या 'सिनार मास'च्या पाणी उपशावर श्वेतपत्रिका काढा, मगच नव्या प्रकल्पांवर शेतकऱ्यांच्या हक्काची भाषा बोला! ..काकांच्या निर्णयांचा वारसा स्वीकारता, मग त्या निर्णयांचा हिशोब देण्याची तयारी आहे का? शेतकऱ्यांच्या पाण्याचा कळवळा खरा असेल, तर सिनार मासच्या पाणी उपशावरही बोला!

आज सोलापूर जिल्ह्याला मोठ्या गुंतवणुकीची गरज आहे. आपल्या तरुणांना नोकरीसाठी पुणे, मुंबई, हैदराबाद किंवा बंगळुरूला स्थलांतर करावे लागू नये, यासाठी आपल्या जिल्ह्यातच रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या पाहिजेत.आधुनिक तंत्रज्ञान, माहिती-तंत्रज्ञान, स्वच्छ ऊर्जा आणि औद्योगिक गुंतवणूक यामुळे सोलापूरच्या विकासाला नवी दिशा मिळू शकते.

– श्री प्रदीप पाटील
जिल्हा सरचिटणीस भारतीय
जनता पार्टी सोलापूर जिल्हा पूर्व..

पडघ्यात १० नोव्हेंबरला रंगणार 'दिवाळी पहाट'!; सुमधुर गीतांचा सुरेल नजराणा; भव्य किल्ला बनवा स्पर्धेचेही आयोजन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

दिवाळीच्या मंगलमय वातावरणात सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी पडघा सांस्कृतिक मंचाच्या वतीने मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२६ रोजी भव्य 'दिवाळी पहाट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सांगीतिक सोहळ्यात रसिकांना सुमधुर गीतांचा सुरेल नजराणा अनुभवता येणार आहे. या कार्यक्रमात ह.भ.प. दिलीप बजागे यांच्यासह विविध गायक व कलाकार आपल्या गायनकलेतून रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. यामध्ये कु. तनिषा प्रदीप मते, कु. समृद्धी गणेश पाटील, गणेश पाटील आणि कु. प्रथम पाटील यांचा सहभाग असणार आहे. याचबरोबर दिवाळीनिमित्त भव्य किल्ला बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धकांनी तयार केलेल्या किल्ल्यांचे फोटो व स्वतःची नावे आयोजकांकडे ८ नोव्हेंबरपर्यंत पाठवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेतील विजेत्यांना १० नोव्हेंबर रोजी कार्यक्रमस्थळी आकर्षक बक्षिसे व पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. हा सांगीतिक सोहळा सकाळी ६ ते ९ या वेळेत बाजारपेठ, पडघा येथील रुचिरा हॉटेलच्या बाजूला आयोजित करण्यात आला आहे. दिवाळीचा आनंद, संगीताची मेजवानी आणि सांस्कृतिक परंपरेचा संगम अनुभवण्यासाठी पडघा व परिसरातील नागरिक, महिला, युवक आणि संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पडघा सांस्कृतिक मंचाच्या आयोजकांनी केले आहे.

राज्यातील भरती परीक्षा सुधारणांसाठी गठित उच्चस्तरीय समितीचा अंतरिम अहवाल शासनास सादर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यातील भरती परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह करण्याच्या उद्देशाने शासन निर्णय दिनांक ४ सप्टेंबर २०२६ अन्वये उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. या समितीने राज्यातील विविध विभागांमधील विद्यार्थी व संबंधित हितधारकांशी केलेल्या सल्ला मसलतीदरम्यान प्राप्त मागण्या, सूचना व अभिप्रायांचा अभ्यास केला आहे. विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या काही महत्त्वाच्या व तातडीच्या मुद्यांवर प्राधान्याने निर्णय घेणे आवश्यक असल्याने समितीने अंतरिम अहवाल शासनास सादर केला आहे.

उच्चस्तरीय समितीच्या प्रमुख शिफारशी

परीक्षेतील पदसंख्येत वाढ : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६

या परीक्षेसाठी सुमारे १२ लाख उमेदवारांनी अर्ज केले असून सध्यास्थितीत ५ हजाराहून अधिक पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. विविध विभागांकडून आणखी ११ हजाराहून अधिक पदांची मागणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आली आहे. ही अतिरिक्त पदे शुद्धिपत्रकाद्वारे समाविष्ट करून एकूण पदसंख्या १६ हजारापेक्षा अधिक करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

उमेदवारांच्या मागण्यांचा विचार करून कमाल वयोमर्यादेत एक वेळची विशेष बाब म्हणून एक वर्षाची सवलत देण्याची शिफारस करण्यात आली आहे. ही सवलत दिनांक १ जानेवारी २०२६ नंतर प्रसिद्ध झालेल्या व निवड प्रक्रिया सुरू न झालेल्या सर्व जाहिराती, तसेच दिनांक ३१ डिसेंबर २०२७ पर्यंत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींसाठी लागू राहील. तसेच, गट-क परीक्षा २०२६ परीक्षेसाठी अतिरिक्त पदांकरीता व वयोमर्यादा सवलतीमुळे पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना संधी मिळावी यासाठी अर्ज प्रक्रिया एकदा पुन्हा सुरू करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणाऱ्या परीक्षा प्रक्रियेबाबत इतर महत्त्वाच्या शिफारशी

गट-क पूर्व परीक्षेच्या विद्यमान परीक्षा पद्धतीत व अभ्यासक्रमात कोणताही बदल न करणे, नव्याने समाविष्ट होणाऱ्या संवर्गांचे मुख्य परीक्षेचे अभ्यासक्रम लवकरच जाहीर करणे, खबरदारीचा उपाय म्हणून यापूर्वीची प्रश्नपत्रिका निर्मितीची कार्यवाही रद्द करून सुरक्षित प्रक्रियेद्वारे नव्याने प्रश्नपत्रिका तयार करणे, प्रश्नपत्रिका व ओएमआर उत्तरपत्रिकांची छपाई, साठवणूक व वाहतूक यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवणे, तसेच परीक्षा केंद्रांवर पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही देखरेख, सिग्नल जॅमर आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची व्यवस्था करणे आदी शिफारशी समितीने केल्या आहेत.

दुष्काळग्रस्त ८७ लाख ४५ हजार शेतकऱ्यांना ४,३७२ कोटींची दिवाळी अग्रीम मदत

(पान १ वरून..) जिल्ह्यातील १ लाख १५८ शेतकऱ्यांना ५० कोटी ८ लाख रुपये, चंद्रपूर जिल्ह्यातील २ लाख ६२९ शेतकऱ्यांना १०० कोटी ३१ लाख रुपये, गडचिरोली जिल्ह्यातील ३० हजार ७८८ शेतकऱ्यांना १५ कोटी ३९ लाख रुपये, गोंदिया जिल्ह्यातील ७४ हजार ९१० शेतकऱ्यांना ३७ कोटी ४६ लाख रुपये, नागपूर जिल्ह्यातील १ लाख ९२ हजार ७६६ शेतकऱ्यांना ९६ कोटी ३८ लाख रुपये आणि वर्धा जिल्ह्यातील १ लाख ५० हजार ७९० शेतकऱ्यांना ७५ कोटी ४० लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.

नाशिक विभागातील १८ लाख ७ हजार ३२ शेतकऱ्यांच्या खात्यात ९०३ कोटी ५२ लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील ८ लाख ७ हजार २८४ शेतकऱ्यांना ४०३ कोटी ६४ लाख रुपये, धुळे जिल्ह्यातील ६५ हजार ९३० शेतकऱ्यांना ३२ कोटी ९७ लाख रुपये, जळगाव जिल्ह्यातील ४ लाख ८ हजार ६३५ शेतकऱ्यांना २०४ कोटी ३२ लाख रुपये, नंदुरबार जिल्ह्यातील १ लाख ७ हजार ५३४ शेतकऱ्यांना ५३ कोटी ७७ लाख रुपये आणि नाशिक जिल्ह्यातील ४ लाख १७ हजार ६४९ शेतकऱ्यांना २०८ कोटी ८२ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.

पुणे विभागातील १५ लाख ६ हजार ३८६ शेतकऱ्यांच्या खात्यात ७५३ कोटी १९ लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ७४ हजार ८९३ शेतकऱ्यांना ३७ कोटी ४५ लाख रुपये, पुणे जिल्ह्यातील ३ लाख २८ हजार ५४२ शेतकऱ्यांना १६४ कोटी २७ लाख रुपये, सांगली जिल्ह्यातील २ लाख ६ हजार ६०० शेतकऱ्यांना १०३ कोटी ३० लाख रुपये, सातारा जिल्ह्यातील ३ लाख १ हजार ४६७ शेतकऱ्यांना १५० कोटी ७३ लाख रुपये आणि सोलापूर जिल्ह्यातील ५ लाख ९४ हजार ८८४ शेतकऱ्यांना २९७ कोटी ४४ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.

तांत्रिक अडचणी दूर करून उर्वरित शेतकऱ्यांनाही मदत

काही शेतकऱ्यांच्या बँक खात्यांशी संबंधित तांत्रिक अडचणी, खाते तपशीलातील त्रुटी किंवा अन्य कारणांमुळे मदतीची रक्कम जमा होण्यास विलंब झाला आहे. अशा शेतकऱ्यांच्या अडचणींचे निराकरण करून त्यांना अग्रीम मदत देण्याची कार्यवाही सुरू आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त एकही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी शासन कटिबद्ध असून, दिवाळी अग्रीम मदतीच्या वितरणावर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. तांत्रिक अडचणी दूर झाल्यानंतर उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही मदत मिळणार असल्याचे मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी स्पष्ट केले.

निफाड शहरात 'नमो उद्यान'चे आ.बनकर यांचे हस्ते लोकार्पण

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राज्य शासनामार्फत वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या रक्कम रु. १ कोटी निधीतून निफाड शहराचा सर्वांगीण विकास, पर्यावरण संरक्षण आणि नागरिकांना दर्जेदार सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी वैशिष्टपूर्ण योजने अंतर्गत निफाड नगरपंचायत हद्दीत महाराष्ट्रातील लोककला या संकल्पनेवर आधारीत नमो उद्यान विकसीत करण्यात येत आहे. . निफाड नगरपंचायतीमार्फत महाराष्ट्रातील लोककला या संकल्पनेवर आधारीत नमो उद्यान विकसीत करण्यात येत आहे. या अभिनव उद्यानाच्या लोकार्पण सोहळा आमदार श्री. दिलीपकाका बनकर यांचे शुभ हस्ते संपन्न झाला.





तसेच सदर प्रसंगी.. नाशिक विधानपरिषद सदस्य गोकुळजी गीते यांनी प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी प्रथम नगराध्यक्ष राजाराम छबू शेलार हे होते..या कार्यक्रमास लक्ष्मण भिकाजी कापसे यांचे मोलाचे सहकार्य लाभले , असून कार्यक्रमासाठी राजाभाऊ राठी , . नंदलालजी चोरडिया, . शिवाजी राजे ढेपले, . गणेश बनकर हे उपस्थित होते, या उद्यानामुळे निफाड शहरातील अबालवृद्धांसाठी विरंगुळ्याचे आणि निसर्गरम्य वातावरणाचे एक उत्तम केंद्र उपलब्ध झाले असून. नागरिकांचे आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि शहराच्या सौंदर्यात भर घालण्याच्या उद्देशाने या उद्यानाची निर्मिती करण्यात आली आहे. या उद्यानामध्ये लहान मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी, , वारकरी महिला , लेझिम खेळणारी मुलगी , संबळ वादक असे शिल्प पाहून उपस्थितांनी महाराष्ट्राची लोककला नागरिकांसाठी सुसज्ज वॉकिंग ट्रॅक, ज्येष्ठ नागरिकांसाठी आरामदायी बैठक, ॲम्पि थेटर इत्यादि सुविधा करण्यात आल्या आहे.

निफाड शहरातील उगाव रोड येथील मध्यवर्ती भागात वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत साकारण्यात आलेल्या बहुप्रतीक्षित 'नमो उद्यान' परिसरातील नागरिकांचे आरोग्य, विरंगुळा आणि बालगोपाळांच्या मनोरंजनासाठी उभारण्यात आले... महाराष्ट्राच्या लोककला या संकल्पनेवर आधारित नमो उद्यानातील दगडी कमान , घाट , तुळशी वृंदावन, तसेच महाराष्ट्राच्या लोककलेचा वारसा नवीन पिढीसमोर आणणारी भित्तिचित्र पोवाडा, दशावतार , कोळी नृत्य , सुंबरान (धनगरी नृत्य), तमाशा , डोंबारी नृत्य असे भित्तिचित्रे तसेच वासुदेव , तारपा वादक नव्या रूपात अनुभवयास मिळाल्याबदल समाधान व्यक्त केले महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला, संस्कृती व परंपरेचा वारसा जपणाऱ्या या अभिनव उद्यानाच्या माध्यमातून निफाडच्या वैभवात आणखी एक मानाचा तुरा रोवला जात आहे नागरिकांना निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवता यावा आणि लहान मुलांना खेळण्यासाठी हक्काची जागा मिळावी यासाठी या मध्यवर्ती जागेची निवड करण्यात आली... उद्यानाची प्रमुख वैशिष्ट्ये व सुविधा आरोग्यासाठी ग्रीन जिम व ट्रॅक संध्याकाळी फिरणाऱ्यांसाठी प्रशस्त वॉकिंग/जॉगिंग ट्रॅक आणि व्यायामासाठी आधुनिक ओपन जिमची व्यवस्था करण्यात आली आहे. आकर्षक लॉन आणि वृक्षारोपण: उद्यानात विविध प्रकारची शोभिवंत झाडे लावण्यात आली असून, बसण्यासाठी हिरवेगार आणि सुंदर हिरवळ तयार करण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा: ज्येष्ठ नागरिकांना शांततेत बसून गप्पा मारण्यासाठी आणि विरंगुळ्यासाठी विशेष बैठक व्यवस्था (बेंचेस) करण्यात आली आहे.

उद्घाटन प्रसंगी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, उगाव रोड येथील मध्यवर्ती भागात या वैशिष्ट्यपूर्ण उद्यानाची निर्मिती झाल्यामुळे निफाड शहराच्या सौंदर्यात मोठी भर पडली आहे. नागरिकांनी या सार्वजनिक मालमत्तेची काळजी घ्यावी आणि उद्यानाचा आनंद घ्यावा. संपूर्ण उद्यान परिसर आकर्षक विद्युत रोषणाईने आणि फुलांनी सजवण्यात आला होता. या सुंदर आणि हक्काच्या विरंगुळ्याच्या जागेमुळे निफाड शहर परिसरातील नागरिकांमधून अत्यंत समाधान व्यक्त केले जात आहे.

उद्यानाची निगा राखणे आणि सुरक्षेच्या दृष्टिकोनातून उद्यान दररोज दुपारी ४.०० ते रात्री ८.०० वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुले ठेवण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमास निफाड च्या नगराध्यक्षा. अलका ताई निकम , उप नगराध्यक्ष अनिल पा. कुंदे , साहेबराव बर्डे , . संदीप जेउघाले ,. विमल जाधव, . सागर कुंदे , श्रीमती. रत्नमाला कापसे , कांताबाई कर्दिले , कविता धारराव , रूपाली रंधवे ,. अरुंधती पवार ,. नयना निकाळे , सुलोचना होळकर , किरण कापसे , किशोर ढेपले , . जावेद शेख , संदीप शिंदे , सचिन गीते, . धिरज भामरे मुख्याधिकारी निफाड न. प ,. मयूरी नवले ,. निलेश ठाकूर, राहुल लमखेडे , . गौरव मोरे , जयसिंग ठाकरे , . शरद बोडके, शरद काकुळते , दिनेश सोनवणे , अनिल कुंदे , राजेंद्र भवर , रतन खालकर, विपुल सैंद्रे , . नरेश धारराव , . बापू कुंभारडे , कु. उज्वला दिघे , गीते मॅडम ई. उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन पाण्याचा काटकसरीने वापर करावा : पालकमंत्री जयकुमार गोरे

महापालिका व नगरपालिकांनी १० टक्के पाणी बचत करावी; पाणी आवर्तनाचे काटेकोर नियोजन करावे नदीकाठच्या गावांना एक दिवस आड सलग सहा तास वीज पुरवठा होणार



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर (जिमाका) : जिल्ह्यातील उपलब्ध पाणीसाठा लक्षात घेता पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन सर्व पाणीपुरवठा योजनांना नियमानुसार पाणी उपलब्ध करून देण्यात येईल. उजनी धरणासह मध्यम व लघु प्रकल्पांतील पाणीसाठा मर्यादित असल्याने नागरिकांनी पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करावा. महापालिका व नगरपालिकांनी शासन निर्णयानुसार १० टक्के पाणी बचतीचे काटेकोरपणे नियोजन करावे, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित उजनी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान आवताडे, आमदार उत्तम जानकर, आमदार अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण चे अधीक्षक अभियंता सुभवेंद्र खांडेकर, धीरज साळी, जलसंपदाचे कार्यकारी अभियंता सुनील पवार, श्री. कंदले, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. तर खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार सचिन कल्याणशेट्टी, पुणे जिल्हाधिकारी, अहिल्यानगर जिल्हाधिकारी तसेच जलसंपदाचे पुणे येथील वरिष्ठ अधिकारी हे दूरदृश्य प्रणाली द्वारे सहभागी होते.

पालकमंत्री श्री. गोरे म्हणाले की, सद्यस्थितीत उजनी धरणात ६५ टक्के पाणीसाठा असून मध्यम व लघु प्रकल्पांमध्येही अत्यल्प पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे उपलब्ध पाणी प्रामुख्याने पिण्यासाठी आरक्षित ठेवण्यात आले आहे. पाणीपुरवठा योजनांना नियमानुसार पाणी उपलब्ध करून देण्यात येईल. पाण्याचा अनावश्यक वापर आणि होणारी नासाडी रोखण्यासाठी प्रशासनासह लोकप्रतिनिधी व नागरिकांनीही प्रयत्न करावेत. धरणातील पाण्याची सद्यस्थिती शेतकरी व नागरिकांना समजावून सांगण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधींनीही घ्यावी. पाण्याची नासाडी टाळल्यास किमान १० ते १५ टक्के पाणी बचत करणे शक्य असल्याचे पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

नदी व कालव्यालगतच्या गावांना एक दिवसाआड सलग सहा तास वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत लोकप्रतिनिधीच्या मागणीप्रमाणे नियोजन करावे. यासाठी जिल्हाधिकारी सोलापूर यांनी पुणे व अहिल्यानगर जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय ठेवावा. तिन्ही जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना एकाच वेळी आणि समप्रमाणात वीजपुरवठा उपलब्ध होईल, याची दक्षता घ्यावी. ज्या शेतकऱ्यांकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे आणि पिके उभी आहेत, त्यांना आवश्यक पाणी मिळणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे वीजपुरवठा खंडित करण्याबाबत निर्णय घेताना शेतकऱ्यांच्या पिकांचा विचार करून योग्य नियोजन करावे, असेही त्यांनी निर्देशित केले.

पाणी प्रकल्पातून आवर्तन सुरू करण्यापूर्वी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधावा. आवर्तन सुरू करण्यापूर्वी संबंधित भागात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेतील लागू तरतुदींनुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्याबाबत कार्यवाही करावी. पाणी सोडल्यानंतर कालवा फोडणे किंवा पाण्याचा अनधिकृत उपसा करणे असे प्रकार आढळल्यास जलसंपदा विभागाने संबंधितांविरुद्ध तात्काळ गुन्हे दाखल करावेत. पोलीस विभागानेही अशा प्रकारांची गंभीर दखल घेऊन कठोर कार्यवाही करावी, असे निर्देश पालकमंत्री गोरे यांनी दिले.

पुढील पाणी आवर्तनाचे नियोजन डिसेंबर २०२६ अखेर, जानेवारी २०२७ च्या पहिल्या आठवड्यात तसेच फेब्रुवारी २०२७ मध्ये उपलब्ध पाणीसाठा व गरज लक्षात घेऊन करावे. जलसंपदा विभागाच्या नादुरुस्त यंत्रणा तातडीने दुरुस्त करून घ्याव्यात. तसेच अतिरिक्त पंप उपलब्ध करून घेण्यासाठी संबंधित उपाययोजनेंतर्गत आवश्यक निधीची मागणी करावी, असेही त्यांनी सूचित केले. यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार सुभाष देशमुख, आमदार अभिजीत पाटील, आमदार उत्तम जानकर आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार राजेंद्र राऊत यांनी पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करण्याची मागणी केली. पाणीपुरवठा करताना शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचेल आणि जिल्ह्यातील प्रत्येक गावातील नागरिकांना पुरेसे पाणी उपलब्ध होईल, याची दक्षता घेण्याची सूचना त्यांनी केली.

जिल्हाधिकारी म्हणाले की, पालकमंत्री महोदय यांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल. तसेच जिल्हाधिकारी अहिल्यानगर व जिल्हाधिकारी पुणे यांच्याशी समन्वय ठेवून नदीकाठच्या गावांना वीज पुरवठा बाबत कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

प्रारंभी अधीक्षक अभियंता श्री खांडेकर यांनी उजनी धरण व जिल्ह्यातील सर्व मध्यम प्रकल्प व लघु प्रकल्पातील पाण्याची सद्यस्थिती सांगितली. आज रोजी उजनी धरणात ६५ टक्के पाणी उपलब्ध आहे तर मध्यम प्रकल्पांच्या पाणीसाठ्याच्या दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या सद्यस्थितीनुसार, एकरुख प्रकल्पातील ०.५५ टीएम सी पाणीसाठ्यावर सोलापूर, गोदुताई परुळेकर सहकारी संस्था व १४ ग्राम पंचायती अवलंबून असून ते पाणी दि. ३० जून २०२७ पर्यंत पुरणार आहे. हिंगणी (पा) प्रकल्पातील ०.४४ टीएमसी पाण्यावर वैराग व ९ ग्राम पंचायती अवलंबून असून ते दि. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत, तर जवळगाव प्रकल्पातील ०.३६ टीएमसी पाण्यावर ९ ग्रामपंचायती अवलंबून असून तेही दि. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पुरणार आहे. मांगी प्रकल्पातील ०.०९ टीएमसी पाण्यावर १३ ग्राम पंचायती अवलंबून असून ते फक्त दि. ३१ जानेवारी २०२७ पर्यंत, आष्टी प्रकल्पातील ०.४८ टीएमसी पाण्यावर माढा व ६ ग्रामपंचायती अवलंबून असून या योजनेसाठी उजनी डाव्या कालव्यावाटे पाणी सोडण्यात येते, बोरी प्रकल्पातील ०.१७ टीएमसी पाण्यावर अक्कलकोट व ७ ग्रामपंचायती अवलंबून असून ते दि. २८ फेब्रुवारी २०२७ पर्यंत, तर पिंपळगाव (दा) प्रकल्पातील ०.०२ टीएमसी पाण्यावर ७ ग्रामपंचायती अवलंबून असून ते केवळ दि. ३१ डिसेंबर २०२६ पुरेल असे त्यांनी सांगितले.

उर्वरित रब्बी हंगामातील अपेक्षित पाणीवापराचा कालावधी दि. ४ नोव्हेंबर २०२६ ते २८ फेब्रुवारी २०२७ असा नियोजित करण्यात आला आहे. या कालावधीत बाष्पीभवन व्ययासाठी ४.२८ टीएमसी, जलाशय उपसा सिंचनासाठी ३.२१ टीएमसी, जलाशय बिगर सिंचन (पिण्यासाठी) ०.८२ टीएमसी, जलाशय बिगर सिंचन (औद्योगिक) ०.६० टीएमसी आणि जलाशयातील गाळासाठी ३.८७ टीएमसी पाणी नियोजित आहे. तसेच सीना-माढा उपसा सिंचन योजनेच्या सिंचन आवर्तनासाठी दि. १५ डिसेंबर २०२६ ते १० फेब्रुवारी २०२७ या कालावधीत १.३१ टीएमसी, दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या सिंचन आवर्तनासाठी याच कालावधीत ०.५७ टीएमसी, कालवा प्रवाही सिंचन आवर्तनासाठी (आष्टी व एकरुख उपसा सिंचन योजनांसह) दि. १ जानेवारी २०२७ ते १५ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत ९.५० टीएमसी, तर भीमा-सीना जोड कालव्याच्या सिंचन आवर्तनासाठी (बार्शी, शिरापूर व शिराळा उपसा सिंचन योजना आणि आकस्मिक वापरासह) दि. २५ डिसेंबर २०२६ ते २५ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत ४.५३ टीएमसी पाणी नियोजित करण्यात आले आहे. याशिवाय भीमा नदीतून पिण्याच्या पाण्यासाठी ९.०० टीएमसी पाणी राखीव ठेवण्यात आले आहे. अशा प्रकारे उर्वरित रब्बी हंगामासाठी एकूण ३७.६९ टीएमसी पाणी वापराचे नियोजन करण्यात आले आहे.

ऊसतोडणी हार्वेस्टरऐवजी मजुरांमार्फत करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे साखर कारखान्यांना निर्देश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर (जिमाका) : जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता वाढविण्याच्या दृष्टीने साखर कारखान्यांनी ऊसतोडणी हार्वेस्टर मशीनऐवजी ऊसतोड कामगारांमार्फत (मॅन्युअली) करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी जिल्ह्यातील साखर कारखान्यांना दिले आहेत.



सन २०२६ च्या खरीप हंगामात ट्रिगर-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये विविध उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. चालू वर्षी जून ते सप्टेंबर या कालावधीत अत्यंत कमी व खंडित पाऊस झाल्यामुळे जिल्ह्यात गंभीर दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे सर्वसामान्य शेतीबरोबरच पशुपालकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, जनावरांसाठी चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे.

सध्या जिल्ह्यातील साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू होत आहे. सर्वसाधारणपणे हार्वेस्टर मशीनद्वारे ऊसतोडणी केल्यास उसाचे पाचट व वरील भाग (वाढे) शेतातच नष्ट होतात किंवा त्यांचा जनावरांसाठी चारा म्हणून उपयोग करता येत नाही. याउलट, ऊसतोड कामगारांमार्फत हाताने ऊसतोडणी केल्यास मोठ्या प्रमाणात हिरवा चारा (ऊसाचे वाढे) व पाचट उपलब्ध होते. हा चारा ग्रामीण भागातील जनावरांसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतो.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी साखर कारखान्यांना दोन महत्त्वपूर्ण सूचना केल्या आहेत. त्यानुसार, कारखान्यांशी जोडलेल्या शेतकऱ्यांच्या शेतातील ऊसतोडणी करताना हार्वेस्टर मशीनचा वापर टाळून मजुरांमार्फत मॅन्युअल पद्धतीने ऊसतोडणी करावी. तसेच ऊसतोडणीदरम्यान उपलब्ध होणारा हिरवा चारा (वाढे) स्थानिक शेतकरी व पशुपालकांना त्यांच्या जनावरांसाठी तात्काळ उपलब्ध करून देण्याबाबत कारखान्यांच्या स्तरावरून ऊस विकास अधिकाऱ्यांना व मुकादमांना योग्य त्या सूचना द्याव्यात.

साखर कारखान्यांनी या सूचनांची गांभीर्याने अंमलबजावणी केल्यास जिल्ह्यातील हजारो शेतकरी व पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार असून, चारा टंचाईची तीव्रता कमी करण्यास मदत होणार आहे. दुष्काळी परिस्थितीत पशुधनाचे संवर्धन व संभाव्य चारा टंचाईवर मात करणे ही सर्वांची सामाजिक व प्रशासकीय जबाबदारी असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

ऊसाचे वाढे व पाचट जनावरांच्या चाऱ्यासाठी उपलब्ध करून द्यावे; दुष्काळी परिस्थितीत पशुधन संवर्धनासाठी प्रशासनाचा पुढाकार

युवा उद्योजक आकाश माने यांच्या वतीने आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त दिवाळी किटचे वाटप



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ब्रह्मपूर : प्रतिनिधी

ब्रह्मपूर येथे तालुक्याचे लोकप्रिय आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त ७० दिवाळी किटचे वाटप करण्यात आले यावेळी उपस्थित अक्कलकोट पंचायत समितीचे उपसभापती सागर दादा कल्याणशेट्टी बीजेपी नेते बाबा पाटील मागासवर्गीय सेल्स चे तालुकाध्यक्ष अमोल फुटगे युवा उद्योजक आकाश माने बोरेगावचे सरपंच गाढवे साहेब माजी सरपंच ईमामोदीन पिरजादे हनुमंत नागेशी दादा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष रहमान भाई पिरजादे विजयकुमार बनसोडे मारुती बनसोडे काशिनाथ बनसोडे सुरेश बनसोडे अंबादास बनसोडे शिवाजी बनसोडे शरणाप्पा हेगडे परमेश्वर बनसोडे अनंत बनसोडे मिथुन बनसोडे सिद्धाराम बनसोडे असद मुजावर कैफ पिरजादे अक्षय बनसोडे सुदर्शन बनसोडे प्रसाद कांबळे वैभव उकरंडे बंडू घायाळ राहुल घायाळ नवनाथ इरवाडकर मलकारजी इरवाडकर आधी सहगावकरी व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या यावेळी युवा नेते उत्तम बनसोडे यांनी आपलं मनोगत व्यक्त करत असताना बोलले की प्रणाली डेव्हलप चे सर्वेसर्वा युवा उद्योजक आकाश माने यांच्या संकल्पनेतून व दादांच्या वाढदिवसानिमित्त दुष्काळजन्य परिस्थितीवर गरजू लोकांची दिवाळी गोड करण्यासाठी अतिशय चांगला उपक्रम या ठिकाणी राबवला गेला त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

सरपंच कोमल मांटे यांच्या पुढाकारातून शेतकऱ्यांसमोर शोषखड्ड्याचे प्रात्यक्षिक

मौजे दरेगाव येथे 'जलतारा' प्रकल्पाचा तालुक्यातील पहिला शुभारंभ!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

सिंदखेडराजा तालुका शासनाचा गाव पाणीदार करण्याच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'जलतारा' प्रकल्पाचा सिंदखेडराजा तालुक्यातील मौजे दरेगाव, येथे सर्वप्रथम शुभारंभ करण्यात आला.



गावाच्या पाणीपातळीत वाढ व्हावी, पावसाचे पाणी जमिनीत मुरून भूजलसाठ्यात वाढ व्हावी आणि जलसंधारणाच्या माध्यमातून गाव पाणीदार व्हावे, या उद्देशाने सरपंच कोमल रवी मांटे,मा.उपसरपंच प्रकाश काळे, तंटामुक्ती अध्यक्ष बबनभाऊ जायभाये, इतर गावातील मंडळी पुढाकार घेत गावातील सर्व शेतकरी बांधवांना एकत्रित केले. यावेळी शेतकऱ्यांना जलतारा प्रकल्पाचे महत्त्व व उपयोग समजावून सांगण्यासाठी शोषखड्ड्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. तालुका कृषी अधिकारी रामेश्वर भुते,सहाय्यक कृषी अधिकारी स्वाती सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रात्यक्षिक घेण्यात आले. जलसंधारणाच्या या उपक्रमात गावातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व ओळखून त्याचे संकलन व जमिनीत पुनर्भरण करणे ही काळाची गरज असून, जलतारा प्रकल्पाच्या माध्यमातून गाव पाणीदार करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. जलसंधारणाच्या दिशेने दरेगावने टाकलेले हे पहिले पाऊल असून, तालुक्यात जलतारा प्रकल्पाचा प्रथम शुभारंभ करण्याचा मान दरेगावने मिळविला आहे.

दिवाळीनिमित्त निफाड नगरपंचायतीतर्फे सफाई कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना फराळ व बोनस वाटप



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी

दिपावलीच्या पावन पर्वाचे औचित्य साधून निफाड नगरपंचायतीचे प्र. नगराध्यक्ष . अनिल पा. कुंदे यांच्या वतीने शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या सफाई कामगारांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. तसेच कंत्राटी सफाई कामगारांना प्रत्येकी ₹२,०००/- दिवाळी बोनस देण्यात आला.

धनत्रयोदशी व दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमामध्ये निफाड नगरपंचायतीतील सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांनाही दिवाळीनिमित्त बोनस देण्यात आला. त्याचबरोबर नगरपंचायतीच्या वतीने सर्व सफाई कर्मचारी, अधिकारी, कर्मचारी व कामगार यांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.

सण-उत्सवाच्या काळातही शहराची स्वच्छता अबाधित ठेवण्यासाठी सफाई कामगार प्रामाणिकपणे व अहोरात्र कार्यरत असतात. त्यांच्या या महत्त्वपूर्ण आणि निःस्वार्थ सेवेची दखल घेऊन दरवर्षीप्रमाणे यंदाही त्यांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.या विशेष कार्यक्रमात महिला व पुरुष सफाई कामगारांना लाडू, करंजी, चकली आदी दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.. सदर कार्यक्रमास निफाड नगरपंचायतीचे प्र. नगराध्यक्ष . अनिल पा. कुंदे, मुख्याधिकारी धीरज भामरे, सभापती . साहेबराव बर्डे तसेच नगरपंचायतीचे सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

दीपावलीनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचा पारंपरिक अलंकारांनी मनोहारी साज

श्री विठ्ठल, श्री रुक्मिणी मातेसह परिवार देवतांना पारंपरिक अलंकार परिधान; मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही दीपावली महोत्सव धार्मिक उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात येत आहे. वसुबारसपासून दीपावली महोत्सवास प्रारंभ झाला असून, या मंगलपर्वानिमित्त श्री विठ्ठल, श्री रुक्मिणी माता तसेच परिवार देवतांना परंपरेनुसार विविध आकर्षक व मौल्यवान पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत. यामुळे श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे रूप अधिकच मनोहारी व तेजस्वी दिसत असून, दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना या अलंकारांचे विशेष आकर्षण निर्माण झाले आहे, अशी माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री. प्रविणकुमार घम यांनी दिली.





श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, नामनिळाचा, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हिऱ्याचे कंगन जोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी, मत्स्य जोड, मोठा शिरपेच, लहान शिरपेच, तुळशीची माळ, एकदाणी, तोडे जोड, मोहरांची माळ, जवेची माळ इत्यादी पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

तसेच श्री रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, तांबडी चिंचपेटी, जवमनी पदक, लक्ष्मीहार, जवेच्या माळा, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी व कंबरपट्टा इत्यादी पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

मंदिरातील परिवार देवतांनाही दीपावलीनिमित्त पारंपरिक अलंकारांनी सजविण्यात आले आहे. राधिका मातेस नक्षीदार टोप, मोत्याचा कंठा नेकलेस व पुतळ्यांची माळ, तर सत्यभामा मातेस सिद्धेश्वर टॉप, मोत्याचा कंठा, ठुशी व पुतळ्यांची माळ इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे श्री व्यंकटेशास झनक-झनक हार, कोयरी हार, तुळशीचा हार, शाळीग्राम हार, मोहनमाळ व सूर्यकळीचा हार व महालक्ष्मी मातेस सोन्याचे कंगन मोत्याची कंठी लक्ष्मीपदक लॉकेट इमिटेशन नेकलेस पुतळ्यांची माळ अष्टपैलू मण्याची कंठी चांदीची छत्री असे विविध पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

दीपावली हा प्रकाशाचा, मांगल्याचा व आनंदाचा सण असल्याने मंदिर परिसरातही उत्सवाचे विशेष वातावरण निर्माण करण्यात आले आहे. वसुबारस, धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन व दीपावली पाडवा या सणांच्या निमित्ताने श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, तुकाराम भवन, श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप तसेच भक्तनिवास या ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. रंगीबेरंगी विद्युत रोषणाईने मंदिर परिसर उजळून निघाला असून, भाविकांसाठी हे आकर्षण ठरत आहे. दीपावलीच्या मंगलपर्वात श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेचे पारंपरिक पोशाख व अलंकारांचे मनोहारी रूप पाहण्यासाठी तसेच दर्शनाचा लाभ घेण्यासाठी पंढरपूर येथे भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. मंदिर समितीच्या वतीने भाविकांना सुलभ व सुव्यवस्थित दर्शन उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. दीपावलीच्या पवित्र पर्वानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे मंगलमय दर्शन व पारंपरिक अलंकारांचे दर्शन भाविकांसाठी विशेष पर्वणी ठरत आहे, असे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्री. श्रीकांत यादव यांनी सांगितले.

कल्याणशेट्टी महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांची फटाके मुक्त दिवाळी रॅली



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

शहरातील नागरिकांकडून कौतुक

प्रतिनिधी/अक्कलकोट : सुरक्षित दिवाळी सुंदर दिवाळी फटाके मुक्त दिवाळी आरोग्यदायी दिवाळी पशुपक्ष्यांचा विचार करा फटाके मुक्त दिवाळी साजरी करा एक ध्यास स्वच्छ पर्यावरणाचा श्वास फटाके मुक्त दिवाळी हरित दिवाळी घोषणा देत कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शहर परिसरात फटाके मुक्त दिवाळीचा संदेश दिला शहरातील नागरिकांनी रॅली बद्दल स्वयंसेवकांचे कौतुक केले

स्वामी विवेकानंद संस्था संचलित मातोश्री गुरु बसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने फटाके मुक्त दिवाळीचा संदेश समाजापर्यंत पोहोचावा या उद्देशाने रॅली आयोजित केली होती रॅलीचे संयोजन कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक राजशेखर पवार व महिला कार्यक्रमाधिकारी प्राध्यापिका डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी केले

महाविद्यालय हनूर चौक कारंजा चौक बाजारपेठ मार्गे श्री स्वामी समर्थ मंदिरापर्यंत रॅली काढण्यात आली रॅलीचे नागरिकांनी ठिकठिकाणी स्वागत केले रॅलीमध्ये प्रा सौरभ भस्मे प्राध्यापिका सौंदर्य शास्त्री मनीषा शिंदे ऐश्वर्या तारापूर सोनाली कटकधोंड बालाजी कांबळे सहभागी झाले

राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांचे संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी विद्यापीठ संचालक डॉ राजेंद्र वडजे संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी सचिव मल्लिकार्जुन मसुती प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे पुनम कोकळगी रूपाली शहा मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी अभिनंदन केले.

भीषण दुष्काळामुळे माणुसकीची दिवाळी साजरी करा

दिवाळीचा सण फटाक्यांशिवाय, प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरी करण्याचा संकल्प केला पाहिजे यंदा भीषण दुष्काळ असल्यामुळे फटाक्याच्या देखाव्यापेक्षा ज्यांच्याकडे नाही त्यांना गोडधोड देऊन माणुसकीची दिवाळी साजरी करा असा सामाजिक संदेश मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी दिला

एन.पी. ग्रुपची कर्मचाऱ्यांसाठी अनोखी दिवाळी भेट बोनस, भेटवस्तूंसह कर्मचाऱ्यांच्या मुलींसाठी दामदुप्पट ठेव

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर / प्रतिनिधी

कर्मचाऱ्यांच्या मेहनतीचा सन्मान आणि त्यांच्या कुटुंबीयांप्रती आपुलकी जपण्याच्या उद्देशाने एन.पी. ग्रुप ऑफ कंपनीज, पंढरपूर यांच्या वतीने आयोजित 'दिवाळी आनंद सोहळा २०२६' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमातून कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासोबतच त्यांच्या कुटुंबीयांच्या भविष्याचा विचार करणारा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.



या सोहळ्याला एन.पी. ग्रुपचे मार्गदर्शक एकनाथ नाना फाटे यांची प्रमुख उपस्थिती एन.पी. ग्रुपचे प्रमुख नागेश फाटे, डॉ. रमेश फाटे आणि उमेश फाटे यांच्या हस्ते ग्रुपमधील विविध आस्थापनांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस, मिठाई आणि आकर्षक भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे 'एन.पी. दाम दुप्पट सुकन्या ठेव योजना'. ग्रुपमध्ये सात वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ निष्ठेने सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सहापात्र मुलींची या योजनेसाठी निवड करण्यात आली. या सहाही मुलींच्या नावाने प्रत्येकी ७ हजार ७०७ रुपयांची रक्कम बँकेत दामदुप्पट ठेव म्हणून जमा करण्यात आली. ठेव प्रमाणपत्रांचे वितरण नागेश फाटे यांच्या हस्ते करण्यात आले.

कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा गौरव करतानाच त्यांच्या मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी आर्थिक तरतूद करण्याचा हा उपक्रम विशेष कौतुकास्पद ठरला. कर्मचारी हे केवळ संस्थेचे घटक नसून एन.पी. ग्रुप परिवाराचे अविभाज्य सदस्य आहेत, ही भावना या उपक्रमातून व्यक्त झाली. कर्मचाऱ्यांचा आनंद आणि त्यांच्या कुटुंबीयांचे समाधान हेच संस्थेचे खरे यश असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. या कार्यक्रमास एन.पी. कन्स्ट्रक्शनचे मॅनेजर निवृत्ती पाटील, अकाउंटंट विनय शिंदे, श्री विठ्ठल अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे मॅनेजर संग्राम कापसे, एन.पी. स्टोन क्रशरचे मॅनेजर विशाल मोरे, फाटे ट्रॅक्टर्सचे मॅनेजर संतोष पुणेकर, बंडू चव्हाण, संदीप रॉय, समाधान बागल, तेजस देवकते, शुभम फाटे, शशांक फाटे, धनंजय गाजरे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डोंबरजवळे येथे पाटील बंधूंच्या शेतात ऊसतोडणीचा शुभारंभ!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : डोंबरजवळे (ता. अक्कलकोट) : आज डोंबरजवळे येथे प्रगतिशील शेतकरी श्री. सतीश पाटील व श्री. श्रीशैल पाटील यांच्या शेतात ऊसतोडणीचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी तोडण्यात आलेला ऊस जय हिंद सहकारी साखर कारखाना, अचेगाव येथे गाळपासाठी पाठविण्यात आला.

याप्रसंगी मुकादम श्री. विकास शिंदे व त्यांचे सहकारी उपस्थित होते. तसेच भाजप कार्यकर्ते श्री. मनोज सुलगडले, उद्योजक श्री. इराप्पा होटकर आणि श्री. हर्षदीप गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी ऊसतोडणी हंगामाला सुरुवात झाल्याने शेतकरी व उपस्थितांनी आनंद व्यक्त केला. शेतकरी बांधवांना ऊस उत्पादनातून चांगले उत्पन्न मिळावे आणि यंदाचा हंगाम सुखकर व भरभराटीचा जावो, अशा शुभेच्छा यावेळी देण्यात आले



शहरातील स्वच्छता, आरोग्य व्यवस्थेचा घेतला आढावा

अधिकाऱ्यांना कडक निर्देश, १५ नोव्हेंबरपासून 'महापौर स्वच्छता आदर्श वार्ड/पॅनल मोहीम'

दिवाळीपूर्वी उल्हासनगरच्या स्वच्छतेसाठी महापौर ॲक्शन मोडवर!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

उल्हासनगर /बाळासाहेब अहिरे: आगामी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर उल्हासनगर शहर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्यासाठी महापौर अश्विनी कमलेश निकम यांनी प्रशासनाला कामाला लावले आहे. शहरातील स्वच्छता, आरोग्य व्यवस्था आणि नागरी सुविधांचा आढावा घेण्यासाठी महापौर कार्यालयात विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्वच्छतेबाबत कडक निर्देश देत कामात कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा दिला.

या बैठकीस स्वच्छता व आरोग्य समितीच्या सभापती सविता तोरणे (रगडे), शिक्षण समितीच्या सभापती साक्षी सुर्वे, उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य) डॉ. दिपाली चौगले, संबंधित विभागांचे अधिकारी, नगरसेवक, स्वच्छता निरीक्षक तसेच मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते, बाजारपेठा आणि निवासी परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मुख्य रस्ते व अंतर्गत रस्त्यांची विशेष स्वच्छता (डीप क्लीनिंग) करण्यासह स्वच्छतेच्या कामावर प्रभावी देखरेख ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांची क्षेत्रनिहाय जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश महापौरांनी दिले.

बाजारपेठांमध्ये प्रत्येक तीन ते चार दुकानांनंतर किमान एक कचरापेटी ठेवावी, प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदीची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, असेही निर्देश देण्यात आले. तसेच बांधकाम व इमारतींच्या पाडकामातून निर्माण होणारा डेब्रिज रस्त्यावर टाकणाऱ्यांना कायदेशीर नोटीस बजावून तो तातडीने हटविण्याची कार्यवाही करण्यास सांगण्यात आले.



शहरातील डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नियमित धूर व औषध फवारणी, कीटकनाशकांचा पुरेसा साठा आणि आरोग्यविषयक उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला. विनापरवानगी गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर तसेच त्यांना पाठीशी घालणाऱ्या संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्याचे निर्देशही महापौरांनी दिले.

याशिवाय विकासकामे पूर्ण झाल्यानंतर रस्त्यांवर पडलेले डेब्रिज हटविणे, चौकांमधील बंद कारंजे सुरू करणे, रस्ता दुभाजकांमधील झाडांना नियमित पाणी देणे, छाटणी व मशागत करणे, दुभाजकांची रंगरंगोटी करणे आणि सार्वजनिक ठिकाणी उभी असलेली बेवारस वाहने हटविण्याबाबतही सूचना देण्यात आल्या.

१५ नोव्हेंबरपासून 'महापौर स्वच्छता आदर्श वार्ड/पॅनल मोहीम'

या बैठकीतील महत्त्वाचा निर्णय म्हणजे शहरातील स्वच्छतेला लोकसहभागाची जोड देण्यासाठी १५ नोव्हेंबर २०२६ ते २० जानेवारी २०२७ या कालावधीत 'महापौर स्वच्छता आदर्श वार्ड/पॅनल मोहीम' राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत गुणांकन समितीमार्फत प्रत्येक वार्ड/पॅनलची पाहणी व मूल्यमापन करण्यात येणार असून प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना २६ जानेवारी २०२७ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य कार्यक्रमात पारितोषिक व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच संबंधित नगरसेवक, प्रभाग अधिकारी आणि स्वच्छता आरोग्य निरीक्षक यांचाही सन्मान केला जाणार आहे. शहर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवणे ही केवळ महापालिकेचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे सर्व विभागांनी सम न्वयाने काम करून दिलेल्या सूचनांची तातडीने अंमलबजावणी करावी आणि प्रगती अहवाल सादर करावा, असे निर्देश महापौर अश्विनी कमलेश निकम यांनी दिले.